
लोकमत

# ओडिशातील विस्तारामध्ये रघुजी भोसले यांची महत्त्वाची भूमिका : सी. आर. दास

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नागपूरकर भोसले यांनी ओडिशा प्रांतामध्ये मराठा साम्राज्याचा विस्तार केला. त्यामध्ये रघुजी भोसले यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. सी. आर. दास यांनी शनिवारी (दि. २) येथे केले.



शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र आणि इतिहास अधिविभाग यांच्यामार्फत आयोजित डॉ. अप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. इतिहास अधिविभागाच्या सभागृहातील या व्याख्यानात त्यांनी 'ओडिशा प्रांतातील मराठा राजकारण - १७९१ ते १८०३' या विषयावर विचार मांडले. अध्यक्षस्थानी इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर, तर डॉ. अवनीश पाटील उपस्थित होते.

डॉ. नीलांबरी जगताप यांनी स्वागत केले. प्रा. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.

Kolhapur Main
Page No. 4 Mar 04, 2019
Powered by: erelego.com

पुढारी

# स्थानिक इतिहास लेखन करताना समकालीन साधने दुर्लक्षित : डॉ. दास

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मोगल साम्राज्याचा पाडाव झाल्यानंतर ब्रिटिश साम्राज्य आले असा समज होतो. कारण हा इतिहास वसाहतवादी दृष्टिकोनातून वसाहतवादी इतिहासकारांनी लिहिला आहे. तर भारतीयांनी तो राष्ट्रभावनेतून लिहिला आहे. यामुळे स्थानिक इतिहास लिखाण करताना मौखिक, प्रादेशिक, समकालीन साधने दुर्लक्षित राहिली, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. सी.आर.दास यांनी व्यक्त केले.

छत्रपती शाहू महाराज मराठा अध्यासन केंद्र, शिवाजी विद्यापीठ यांच्यावतीने आयोजित डॉ. आप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर होत्या.

My Kolhapur Edition
4 Mar, 2019 Page No. 7
Powered by : erelego.com

# जागतिकीकरणात बहुसंस्कृतीचे संक्रमण

## प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : मुरगूडमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

**मुरगूड / प्रतिनिधी :**

बहुसंस्कृतीवादाचे सर्वात महत्त्वाचे उदाहरण हे भारत असून, भारतातील बहुसंस्कृती आणि बहुभाषिक रचना हे खऱ्या अर्थाने इतर संस्कृतीबाबतच्या सन्मानाचे आणि सहिष्णुतेचे आदर्श उदाहरण आहे. वेगवान वैज्ञानिक विकासाच्या आजच्या २१ व्या शतकाच्या टप्प्यावर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत हे बहुसंस्कृतीचे संक्रमण मोठ्या प्रमाणात होत असून, त्यामध्ये सहिष्णुता हा पायाभूत घटक जिवंत असणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



**मुरगूड : परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. डी. टी. शिर्के, प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार, प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार, प्रा. अविनाश सप्रे, आण्णासो थोरवत व अन्य.**

येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार होते. डॉ. शिर्के म्हणाले, मंडलिक महाविद्यालयाने बहुसंस्कृतीवादासारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद घेणे ही बाब अभिनंदनीय आहे. प्राचार्य कुंभार म्हणाले. सदाशिवराव मंडलिक यांच्या प्रेरणेने शिवराय एज्युकेशन संस्था मंडलिक महाविद्यालयाच्या माध्यमातून अतिशय महत्त्वाच्या विषयावर यशस्वी आंतरराष्ट्रीय परिषद घेऊ शकते हे सिद्ध केले आहे. बहुसंस्कृतीवाद ही अटळ बाब असून, आता कोणतीही विद्याशाखा किंवा विषय अलिप्त राहू शकत नाही.बीजभाषक प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार, प्रा. अविनाश सप्रे, डॉ. भनगे, माजी प्राचार्य जीवन साळोखे, कार्यवाह आण्णासो थोरवत, उपप्राचार्य डॉ. शिवाजी होडगे उपस्थित होते. परिषदेला प्रचंड प्रतिसाद मिळाला असून, देशभरातून सुमारे ३०० प्राध्यापक, संशोधक उपस्थित होते. परिषदेच्या आयोजनात डॉ. उदय शिंदे, डॉ. टी. एम. पाटील, डॉ. ए. डी. जोशी यांनी समन्वयक म्हणून सिंहाचा वाटा उचलला आहे. प्रास्ताविक प्रा. डॉ. अद्वैत जोशी यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. डॉ. टी. एम. पाटील यांनी करून दिली. प्रा. डॉ. यू. आर. शिंदे यांनी आभार मानले.

# ग्रामीण संमेलनामुळे वाङ्मयीन संस्कृतीबद्दल जिव्हाळा

## चिंचवाड येथील युवा मराठी साहित्य संमेलनात प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांचे प्रतिपादन

**गांधीनगर / प्रतिनिधी :**

आपल्या परिसरातील वेगळेपण जपत साहित्य चळवळीतील आपल्या अस्तित्वाची जाण व्यक्त करून, वाङ्मयीन संस्कृती प्रवाहित करण्याचे महत्कार्य ग्रामीण साहित्य संमेलनाने केले आहे. अशा संमेलनांनी वाङ्मयीन संस्कृतीबद्दल समाजमनात जिव्हाळा निर्माण केला आहे. चिंचवाडच्या साहित्य संमेलनाने युवा साहित्य चळवळीला प्रेरणा देण्याचे शिवधनुष्य उचलले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक व शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

चिंचवाड (ता. करवीर) येथील दहाव्या ग्रामीण युवा मराठी साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष म्हणून डॉ. शिंदे बोलत होते.




चिंचवड (ता. करवीर) येथे ग्रामीण युवा साहित्य संमेलनात संबोधित करताना समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे. सोबत डॉ. सुनीलकुमार लवटे, राजाभाऊ शिरगुप्पे, डॉ. रावसाहेब पाटील, विजयकुमार बेळंकी, नीलम माणगावे आदी.

ते म्हणाले, राष्ट्राच्या उभारणीत युवकांचे मोठे योगदान असते. त्यांना केंद्रिभूत म्हणून हे साहित्य संमेलन होत आहे.

कथाकार शंकर पाटील, ज्येष्ठ कथाकार प्रा. व. बा. बोधे, प्रा. कृष्णात खोत यांना सन्मानित करण्यात आले. श्रेणिक पाटील, एम. डी. घुगरे, उत्तम पाटील, धनंजय इंगळे, चंद्रकांत बागने यांना सृजनरत्न शिक्षक पुरस्काराने गौरवण्यात आले. अनिल उपाध्ये यांना आदर्श पत्रकारिता पुरस्कार देण्यात आला.

पंचरंग प्रबोधनचे संपादक रावसाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली साहित्य आणि आजची युवा पिढी या विषयावर परिसंवाद झाला. त्यात प्रा. चंद्रशेखर कांबळे व लता आयवळे-कदम यांनी विचार मांडले.

मुकुंद कुमार कळमकर यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे उद्घाटन झाले. कविवर्य विंदा करंदीकर मंडप प्रवेशद्वाराचे उद्घाटन अण्णासाहेब चौगुले यांच्या हस्ते, तर उत्तम तलवारे यांच्या महात्मा गांधी चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन निलोफर शेख यांच्या हस्ते झाले. बाबा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन झाले. त्यात विजय कुमार बेळंके, दिनकर खाडे, विश्वास पाटील, दत्ता गुरव, सांची कांबळे, उमेश सुतार, के. ए. मगदूम आदी कवींनी कविता सादर केल्या. जीवनासाठी साहित्य हा परिसंवाद डॉ. रावसाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाला. प्रा. व. बा बोधे, नीलम माणगावे यांनी विचार मांडले. वाचन कट्टातर्फे घेण्यात आलेल्या अभिनव वाचक स्पर्धेचे बक्षीस वितरण झाले. ज्येष्ठ कवी राजाभाऊ शिरगुप्पे यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे सुनीलकुमार लवटे यांचे भाषण झाले. सृजन वार्ता या विशेषांकाचे प्रकाशनही झाले. भरत रसाळे, बाबा सरकार, सरपंच सुदर्शन उपाध्ये, दीपक मगदूम, उपसरपंच बाबूराव कोळी, किरणसिंह घाडगे, रामचंद्र नांद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. संयोजन संजय पाटील, नयना पाटील, रवींद्र खोत, रावसाहेब खोत, आण्णासाहेब पाटील व सृजन शक्ती परिवाराच्या सदस्यांनी केले. स्वागताध्यक्ष शीतल पाटील होते. प्रास्ताविक संजय पाटील यांनी केले. सूत्रसंचालन उमेश सुतार व सुनीता पाटील यांनी केले. आभार पद्मश्री पाटील यांनी मानले.

सकाळ

# विद्यापीठ अधिसभेवर राम तुपे, महेश निलजे

कोल्हापूर, ता. ३ : दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर विद्यापीठ कर्मचाऱ्यांतून राम बाजीराव तुपे, तर महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांतून महेश बाबूराव निलजे यांची सदस्यपदी निवड झाली. दोघांना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते दुपारी चार वाजता निवडीचे पत्र देण्यात आले.

श्री. तुपे शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे सरचिटणीस आहेत. विद्यापीठात ते सध्या सहायक अधीक्षकपदी असून, शिवाजी विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.



राम तुपे



महेश निलजे

श्री. निलजे महाराष्ट्र राज्य शासकीय महाविद्यालयीन कर्मचारी संघाचे २०१५-१५ पासून विभागीय अध्यक्ष आहेत. पेठवडगाव येथील विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालयात ते अधीक्षक म्हणून कार्यरत आहेत.

श्री. तुपे म्हणाले, ''या निवडीचा मला आनंद झाला आहे अधिसभेमध्ये विद्यापीठातील कर्मचाऱ्यांशी संबंधित प्रश्न मांडण्यासाठी मी बांधील असेन.'' श्री. निलजे म्हणाले, ''महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांचे प्रश्न अनेक आहेत. ते सोडवणे आवश्यक असल्याने त्याबाबत अधिसभेत वाचा फोडली जाईल.''

### सुखद धक्का

विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांतून प्रत्येकी एक सदस्य अधिसभेवर सदस्य म्हणून कोणाची नियुक्ती होणार, या पदासाठी विद्यापीठ कर्मचाऱ्यांतून अनेकांनी फिल्डिंग लावली होती. पदाची नावे जाहीर होताच सुखद धक्का बसला.

Kolhapur, Kolhapur-Today
04/03/2019 Page No. 3